महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती
मध्यवर्ती कार्यालय :- 'तारांगण', कुंदा स्मृती केंद्र, १२, युनायटेड वेस्टर्न बँक कॉलनी,
शाहू नगर, गोडोली, सातारा- ४१५००१.
विज्ञान निर्भयता नीती
राज्य कार्याध्यक्ष संपर्क : 'भास्कर' ६८, कालीकादेवी नगर, संघमा चौक, गोळीबार टेकडी रस्ता, धुळे - ४२४ ००१.
भ्रमण ध्वनी : ९४२२७९०६१० Email : avinashpatilmans@gmail.com

# महाराष्ट्र अंनिसच्या जातपंचायत मूठमाती अभियानाची वाटचाल...

28 जुन 2013 : नाशिक येथे जातपंचायतच्या दबावापोटी आंतरजातीय विवाह केलेल्या प्रमिला कुंभारकरचा तीच्या बापाकडून खूनाची घटना

30 जुन २०१३ : सामाजिक संघटनांचा नाशिक येथे भव्य निषेध मोर्चा.

2 जुलै 2013 : डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा लेख मजाती अंतासाठी हवा वैज्ञानिक दृष्टिकोनफ दैनिक सकाळ मधून प्रसिद्ध.

3 जुलै 2013 : लेख वाचून भटके जोशी समाजाच्या बहिष्कृत केलेल्या अण्णा हिंगमिरे यांच्या महाराष्ट्र अंनिसकडे धाव.

4 जुलै 2014 : अण्णा हिंगमिरे यांची राजकीय दबावाला झुगारून पोलीसांत तक्रार दाखल

6 जुलै 2013 : नाशिकमध्ये जातपंचायतच्या मनमानी विरोधात महाराष्ट्र अंनिसचा मोर्चा.

7 जुलै 2013 : बहिष्कृत व्यक्तींनी महाराष्ट्र अंनिसकडे संपर्क करण्याचे आवाहन दै.सकाळ चे समुह संपादक उत्तम कांबळे यांनी केले.आवाहनाला प्रचंड प्रतिसाद.राज्यभरातुन पिडीतांचा टाहो. बहुतांश जातीत जातपंचायतचे अस्तित्व असल्याचे स्पष्ट.

9 जुलै 2013 : डॉ. दाभोलकर व राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील यांची 'जातपंचायत मूठमाती अभियान' चालवण्याची घोषणा.

10 जुलै 2013: पुणे काँग्रेस चे पदाधिकारी व श्रीगौड ब्राम्हण समाजाचे काका धर्मावत यांची तक्रार महाराष्ट्र अंनिसच्या मदतीने दाखल.राज्यात आश्चर्य व्यक्त.

11 जुलै 2013: मुंबई उच्च न्यायालयाने जातपंचायतीमुळे राज्य घटने समोर आव्हान असल्याचे म्हटले.

2 ऑगस्ट 2013: जातपंचायत या घटनाबाह्य असे मुंबई उच्च न्यायालयाकडून मत प्रगट.

8 ऑगस्ट 2013 : नाशिक येथे पहिल्या जातपंचायत मूठमाती परिषद मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ नागनाथ कोतापल्ले यांच्या उपस्थितीत.राज्यभरातुन पीडितांनी मांडले दाहक अनुभव.

15 ऑगस्ट 2013 : दुसरी जातपंचायत मूठमाती परिषद लातूर येथे.उत्तम कांबळे, बाळकृष्ण रेणके,उचल्याकार लक्ष्मण गायकवाड यांच्या उपस्थितीत बहिष्कृतांचा प्रचंड प्रमाणात प्रतिसाद.

20 ऑगस्ट 2013: डॉ नरेंद्र दाभोलकर यांचा पुण्यात भरदिवसा निर्घृण खून.

28 ऑगस्ट 2013: सातारा येथील निर्धार परिषदेचे जातपंचायत मूठमाती अभियान जोमाने चालू ठेवण्याचा संकल्प.

8 सप्टेंबर 2013: तिसरी नियोजित जातपंचायत मूठमाती परिषद जळगाव येथे. राज्य कार्यध्यक्ष अविनाश पाटील यांच्यासह अॅड. पल्लवी रेणके, अॅड असीम सरोदे यांचे बहिष्कृत कुटुंबीयांना मार्गदर्शन.

2 ऑक्टोबर 2013 : मुंबईच्या जोगेश्वरी येथील वैदु जातपंचायत कडून पत्रकार विलास बढे यांना मारहाण.

17 सप्टेंबर 2013: मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश-जातपंचायत विरोधात फौजदारी गुन्हे दाखल करा व चार आठवड्यात कारवाई बाबत निर्णय घ्यावा.

30 सप्टेंबर 2013: गृह विभागा कडुन एक परिपत्रक जारी. भारतीय दंड विधान संहितेच्या विशिष्ठ कलमांचा आधार घेऊन तक्रार दाखल करून घेण्याचे पोलीसांना आदेश.

30 डिसेंबर 2013: माळेगाव (जि.नांदेड ) येथील यात्रेत अनेक जातपंचायती कडुन अनिष्ट प्रथांना मूठमाती देण्याचा निर्णय.

27 मार्च 2014 : भटक्यांची पंढरी असलेल्या मढी(जि.अहमदनगर) येथील यात्रेत बसणाऱ्या बहुतेक जाती पंचायती रद्द आणि बसलेल्या काही जात पंचायतींकडून विधायक निर्णयांची चर्चा.

28 एप्रिल 2014: जोगेश्वरी येथील वैदु जातपंचायत बरखास्त करण्यासाठी संपादक ज्ञानेश महाराव, माधव बावगे आणि कृष्णा चांदगुडे यांच्या संवादाने सामाजिक सुधारणा मंडळात रुपांतर. महिलांना निम्मे प्रतिनिधीत्व.

28 जुलै 2014: महाराष्ट्र अंनिस व तरुणांच्या मदतीने अहमदनगर येथील पद्मशाली जातपंचायत बरखास्त.

2 सप्टेंबर 2014: महाराष्ट्र अंनिसच्या मदतीने चंद्रपूर येथील पद्मशाली जातपंचायत बरखास्त.

27 सप्टेंबर 2014: महाराष्ट्र अंनिसच्या मदतीने चंद्रपूर येथील आदिवासी गौड जातपंचायत बरखास्त.

25 डिसेंबर 2014: महाराष्ट्र अंनिस व मानवाधिकार संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या मदतीने सांगली येथील कोल्हाटी डोंबारी जातपंचायत बरखास्त.

3 फेब्रुवारी 2015: सामाजिक बहिष्कार टाकणाऱ्यांना त्वरित अटक करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश.

8 फेब्रुवारी 2015: महाड येथे चौथी जातपंचायत मुठमाती परिषद. डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था समवेत झालेल्या परिषदेत गावकीने वाळीत टाकलेल्या ऐंशी कुटुंबीयांना मिळाली लढण्याची हिंमत.

10 मार्च 2015: मढी येथील भटक्या विमुक्त समाजाच्या यात्रेत बसणाऱ्या जात पंचायतींच्या कामकाजाबाबत सर्वेक्षण.

12 मार्च 2015: जातपंचायत विरोधी कायदा तीन महिन्यात करण्यार असल्याची मुख्यमंत्र्यांची विधानसभेत घोषणा.

14, 15 मार्च 2015: धुळे येथे ज्येष्ठ विधीज्ञ निर्मलकुमार सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनात जात पंचायत विरोधी कायदा मसुदा निर्मितीची चर्चा.

16 मार्च 2015: राज्यातील सर्वोच्च वैदु जातपंचायत बरखास्त... महाराष्ट्र अंनिस व प्रसारमाध्यमांच्या प्रयत्नांना आले यश...महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणांच्या इतिहासात महत्वाचे पाउल.

20 मार्च 2015: महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती कडून महाराष्ट्र जातपंचायत कार्यवाही प्रतिबंधक अधिनियम-2015 हा कायद्याचा मसुदा मुख्यमंत्र्यांना महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान मुंबई येथे सादर.

7 नोव्हेंबर 2015: अहमदनगर येथील स्मशानजोगी जात पंचायत महाराष्ट्र अंनिसच्या प्रयत्नाने बरखास्त.

18 नोव्हेंबर 2015: महाराष्ट्र शासनाच्या गृहविभागाने ‘महाराष्ट्र सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम-2015’ हा अधिनियम आपल्या संकेतस्थळावर जारी केला.

2डिसेंबर 2015: महाराष्ट्र अंधश्रद्धानिर्मूलन समितीने आपल्या सूचना व हरकती गृहविभागाकडे नोंदविल्या.

14 डिसेंबर 2015: नागपूर येथे महाराष्ट्र अंनिसकडून जात पंचायत विरोधी कायदा संकल्प परिषदेचे आयोजन. हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर नागपूर येथे बहिष्कृत व्यक्तींसह निदर्शने.

15 डिसेंबर 2015: महाराष्ट्र अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील व शिष्ट मंडळाची मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस आणि सामाजिक न्यायमंत्री ना. राजकुमार बडोले व राज्यमंत्री ना. दिलीप कांबळे यांच्याशी कायद्यासंदर्भात चर्चा.

18 जानेवारी2016: उंब्रज जि. सातारा येथील गोपाळ समाजाची जात पंचायत महाराष्ट्र अंनिसच्या प्रयत्नाने बरखास्त.

25 जानेवारी 2016 - मराठवाडय़ातील गोंधळी जात पंचायत बरखास्त.

28 जानेवारी 2016- सामाजिक न्याय विभागाच्या बार्टी सोबत महाराष्ट्र अंनिसची कार्यशाळा व कायद्याचा संयुक्त मसुदा बनविला.

10 फेब्रुवारी 2016- महाराष्ट्र जात पंचायत कार्यवाही प्रतिबंधक अधिनियम-2015 हा संयुक्त मसुदा गृहविभागाकडे सादर.

1 मार्च 2016- कायद्याचा मसुदा अधिवेशनात मांडण्यासाठी मंत्री मंडळाची मंजुरी.

05 मार्च 2016 - सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांच्या सोबत महाराष्ट्र अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील यांची कायदा होणे बाबत चर्चा.

07 मार्च 2016 - विधान परिषदेचे सभापती रामराजे निंबाळकर व शिवसेनेच्या प्रतोद नीलम गोर्हे यांच्याशी अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील व पदाधिकार्यांची चर्चा.

11 मार्च 2016 - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील व कृष्णा चांदगुडे यांची चर्चा.

12 मार्च 2016 - विविध कॅबिनेट मंत्री, विधानसभेचे अध्यक्ष, विधानपरिषदेचे सभापती,विरोधी पक्षनेते,सर्व राजकीय पक्षांचे गटनेते यांची भेट.

17 मार्च 2016 - विधानसभेत भाजपा आमदार देवयानी फरांदे यांच्या कडून तारांकित प्रश्न उपस्थित. चालू अधिवेशनात कायद्याचा मसुदा संमत करण्याचे गृह राज्य मंत्री राम शिंदे यांची सभागृहाला माहिती.

19 मार्च 2016 - राज्याची भटके जोशी जात पंचायत बरखास्त. महाराष्ट्र अंनिसचे आणखी एक यश.

20 मार्च 2016 - पुणे येथे जातपंचायत विरोधी कायदा मागणीसाठी पाचवी परिषद. डाॅ बाबा आढाव, काॅ. मुक्ता मनोहर आदीसह समविचारी संघटना प्रमुख व पिडीत कुटुंबाची उपस्थिती.

22 मार्च 2016 - विधानसभा व विधान परिषदेच्या सदस्यांची भेट घेऊन कायद्याची उपयुक्तते बद्दल चर्चा.

28 मार्च 2016 - इस्लामपुर ( सांगली) येथे महिलेला अमानुष मारहाण करण्यास सांगणारी गोपाळ जात पंचायत बरखास्त.

28 मार्च 2016 - विधान परिषदेत शिवसेना आमदार नीलम गोऱ्हे यांनी जात पंचायत विरोधी कायद्यासाठी चर्चा घडवून आणली.

30 मार्च 2016 - विधानसभा व विधान परिषदेच्या विविध सदस्यांशी चर्चा.

6 एप्रिल 2016 - मुख्यमंत्री व विविध कॅबिनेट मंत्र्याची चर्चा.महाराष्ट्र अंनिस सोबत बैठक आयोजित करण्याच्या मुख्यमंत्र्यांची सचिवांना सुचना.

11 एप्रिल 2016 - मुख्यमंत्र्यांच्या पुढाकाराने विधानभवनात बैठक. मा.सभापती (विधान परिषद) रामराजे निंबाळकर,जेष्ठ कॅबिनेट मंत्री एकनाथ खडसे,गृहराज्य मंत्री राम शिंदे, शिवसेनाच्या प्रतोद डॉ निलम गोरे, प्रधान सचिव रजनिश सेठ, उपसचिव आ.बा. पाटील आणि महाराष्ट्र अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील व कृष्णा चांदगुडे आदींची उपस्थित.महाराष्ट्र अंनिसच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करुन सुधारित मसुदा विधानसभेत दुसऱ्या दिवशी मांडण्याची तयारी.

13 एप्रिल 2016 - दुपारी 4.35 वाजता जातपंचायत विरोधी कायद्याचा मसुदा विधानसभेत एकमताने मंजूर.सायंकाळी 6 वाजता विधान परिषदेत मसुद्यास एकमताने मंजुरी